# कुलगुरू पदासाठी आज मुलाखती

## राज्यपालांकडून ऑनलाईन व्ही.सी.; विद्यापीठ कार्यक्षेत्राशी चौघे निगडीत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कुलगुरूपदाच्या निवड प्रक्रियेअंतर्गत शोध समितीकडून पाठविण्यात आलेल्या पाच पात्र उमेदवारांच्या सोमवारी (दि.५) राज्यपाल ऑनलाईन मुलाखती घेणार आहेत. यातील चार उमेदवार हे विद्यापीठ कार्यक्षेत्राशी निगडीत आहेत.




शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. सप्टेंबरअखेर व्ही.सी. द्वारे २५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह डॉ. नितीन देसाई (मुंबई), डॉ. कारभारी काळे (औरंगाबाद), डॉ. अविनाश कुंभार, डॉ. अंजली कुरणे (पुणे) या पाच उमेदवारांची अंतिम मुलाखतीसाठी नावे निश्चित करण्यात आली. कुलगुरू पदासाठी ५ ऑक्टोबर रोजी मुलाखती होणार आहेत. अंतिम मुलाखतीसाठी निवडलेले पाचपैकी चार उमेदवार हे शास्त्र शाखेतील आहेत. या उमेदवारांना शैक्षणिकसह प्रशासकीय क्षेत्रातील दीर्घ अनुभव आहे.



**डॉ. डी. टी. शिर्के** हे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) येथील आहेत. सध्या ते संख्याशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक आहेत. प्र-कुलगुरू, कुलसचिव, विभागप्रमुख, अधिसभेसह विविध मंडळांवर त्यांनी काम केले आहे. आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत त्यांचे ८० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याची यशस्वी जबाबदारी पार पाडली आहे.



**डॉ. अविनाश शंकर कुंभार** यांचे मूळगाव (इस्लामपूर, जि. सांगली) आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, अद्ययावत उपकरण केंद्राचे संचालक, इंटरडिसिप्लिनरी स्कूल अँड सायन्सचे प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर ७८ संशोधन लेख प्रसिद्ध झाले आहेत. अमेरिका, जर्मनीतील विद्यापीठांबरोबर संशोधन करार केले आहेत.



**डॉ. कारभारी विश्वनाथ काळे** यांचे गाव सालुखेडा (जि. औरंगाबाद) आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ते संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागातील वरिष्ठ प्राध्यापक आहेत. प्रभारी कुलगुरू, कुलसचिव, बीसीयूडी संचालक, विभागप्रमुख, विविध अधिकार मंडळांवर त्यांनी काम केले आहे. इस्रोच्या 'आयआयआरएफ' प्रकल्पात समन्वयक म्हणून काम पाहिले आहे. १५ आंतरराष्ट्रीय पातळीवरील समित्यांचे ते सदस्य आहेत. त्यांनी आठ पेटंट फाईल करून पब्लिक केले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर ३०० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत.



**डॉ. नितीन शिवाजीराव देसाई** हे तळेवाडी (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) येथील आहेत. सध्या ते मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमधील विज्ञान शाखेचे अधिष्ठाता आहेत. अमेठी युनिव्हर्सिटीचे परीक्षा नियंत्रक, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईचे विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. आंतरराष्ट्रीय ९० संशोधन पेपर आणि चार पेंटट ग्रँटेड आहेत.



**डॉ. अंजली दिनकर कुरणे** या मूळच्या शिवाजी पेठ, कोल्हापूर येथील आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानवविद्याशाखेच्या अधिष्ठता, मानवशास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांनी अधिकार मंडळे, विविध पदांवर काम केले आहे. सामाजिक शास्त्रे व मानवविद्या केंद्राच्या समन्वयक म्हणून त्यांनी पदावर काम पाहिले आहे. ऑक्सफर्ड ग्रुप युनिव्हर्सिटी ऑक्सफर्ड व्हिजिटिंग स्टफ फेलो राहिल्या आहेत. त्यांची पाच पुस्तके प्रकाशित असून ३६ संशोधन लेख प्रसिद्ध झाले आहेत.

# कुलगुरुपदासाठी आज मुलाखती

## शिवाजी विद्यापीठ : ऑनलाईनने होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती आज, सोमवारी कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे घेणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे (एनएमआयएमएस) विज्ञानशाखेचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई यांच्यासह पाचजणांच्या मुलाखती ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.

डॉ. शिर्के, डॉ. देसाई, औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संगणकशास्त्राचे प्राध्यापक डॉ. के. व्ही. काळे, पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील मानव्यविद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. अविनाश कुंभार यांच्या मुलाखती होतील. सायंकाळी पाचनंतर उमेदवारांच्या आडनावांमधील आद्याक्षरानुसार मुलाखतीचा क्रम निश्चित करण्यात आला आहे. या मुलाखतीनंतर कुलगुरुपदासाठीचे अंतिम नाव निश्चित होणार आहे. पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी कुलगुरुपदाकरिता एका उमेदवाराची निवड केली जाणार आहे. दरम्यान, या अंतिम मुलाखतीसाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राची माहिती, विद्यापीठाबाबतच्या भविष्यकालीन योजना, आदींबाबतच्या माहितीची उमेदवारांनी तयारी केली आहे.



### पाच ते सात तास सराव

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यावेळी कुलगुरुपदाच्या निवड प्रक्रियेत मुलाखती या ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. आपली मुलाखत दमदार होण्यासाठी उमेदवारांनी तयारी केली आहे. त्यांतील काही उमेदवारांनी ऑनलाईन मुलाखतीचा पाच ते सात तास सराव केला आहे.